नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०१/२०२६ (रविवार )**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील मा. श्री. राजनाथ सिंह, केंद्रीय संरक्षण मंत्री, भारत सरकार यांचा दौरा यशस्वीपणे पार पडल्याबाबत

दिनांक १८/०१/२०२६ रोजी मा. श्री राजनाथ सिंह, केंद्रीय संरक्षण मंत्री, भारत सरकार यांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील कोंढाळी पोलीस स्टेशन अंतर्गत सोलार डिफेन्स ॲन्ड एयरोस्पेस लिमीटेड, बाजरगाव येथे दौरा कार्यक्रम होता. **सदर कार्यक्रम हा संरक्षण व स्फोटक संबधीत कंपनीच्या प्रतिबंधीत क्षेत्रात असल्याने मा. केंद्रीय संरक्षण मंत्री यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदोबस्ताचे योग्य व काटेकोर नियोजन आवश्यक होते त्याकरीता मा. केंद्रीय संरक्षण मंत्री यांच्या सुरक्षेकरीता असलेल्या सर्व नियमावली व निर्देशानुसार नियोजन करून त्यांची पुर्णता अंमलबजावणी करून नागपुर ग्रामीण जिल्हयात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता.**

संपुर्ण बंदोबस्ताचे प्रभारी अधिकारी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक हे होते तसेच श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा हे सह प्रभारी अधिकारी होते. सदर बंदोबस्ता साठी जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनात सदर बंदोबस्ताची योग्य आखणी करून कॉन्व्हॉय ,हेलीपॉड, रोड बंदोबस्त, कार्यक्रम स्थळ बंदोबस्त असा बंदोबस्त आराखडा तयार केला होता. सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील उपविभागिय पोलीस अधिकारी, यांच्यासह बंदोबस्तात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या सहभागी असलेले पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार , क्युआरटी पथक, आरसीपी पथक, बि.डी.

डी.एस पथके आणि अॅन्टीड्रोन पथक असे अधिकारी/अंमलदार यांनी काटेकोरपणे कर्तव्य पार पाडल्याने मा. श्री राजनाथ सिंह, केंद्रीय संरक्षण मंत्री, भारत सरकार यांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील दौरा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला. बंदोबस्तातील सर्व अधिकारी/अंमलदार यांचे मा.श्री. हर्ष ए. पोद्‌दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी अभिनंदन केले

## बुटीबोरी पोलीस स्टेशन बेपत्ता व्यक्ती खुन प्रकरणात अजुन ३ आरोपी निष्पन्न, बोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— फिर्यादी नामे अभिजित वसंता नेवारे, वय २२ वर्ष, रा. निखाडे ले आऊट, सातगाव, ता. हिंगणा, जि. नागपूर यांनी बोरी पोलीस स्टेशनला माहीती दिली की,दिनांक ०९/०१/२०२६ रोजी फिर्यादीचे वडील वसंता रामाजी नेवारे, वय ४८ वर्ष हे नेहमीप्रमाणे रात्री ०९/३० वा. पर्यंत त्यांच्या मोटारसायकल ने कामावर गेले व दुस—या दिवशी दिनांक १०/०१/२०२६ रोजी सकाळी १०/०० वा. पर्यंत नेहमीप्रमाणे कामावरून घरी न आल्याने फिर्यादीने नातेवाईक व ओळखीचे लोकांकडे तसेच परिसरात त्यांचा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही. त्यांची मो.सा. सातगाव येथील एका दारूचे दुकानाजवळ सापडली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे त्यांचे वडील बेपत्ता असल्याबाबत मिसींग तक्रार दाखल केली.दिनांक १५/०१/२०२५ रोजी नमुद बेपत्ता व्यक्तीचा खुन झाल्याचे उघड झाल्याने नमुद प्रकरणी कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १५/०१/२०२६ रोजी बुटीबोरी पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी **लोकेश उर्फ लंक्या हिरालाल ढाबरे, २८ वर्षे रा. सातगाव, रिधोरा** याला ताब्यात घेवुन त्याला अटक करून त्याचे कडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता फिर्यादीचे वडील मृतक नामे वसंता रामाजी नेवारे, वय ४८ वर्ष, यांना आरोपी लोकेश धाबोर्डे आणि त्याच्या साथीदारांनी वडगाव गुजर ,ता.जि नागपुर येथे नेवुन दारू पिण्याचे वादातुन खुन केल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद प्रकरणी बुटबोरी पोलीसांनी **आरोपी क्रं २ ब्रिजेश भैय्यालाल**

**कुमार ,वय २५ वर्षे, रा. शिवप्रसाद नगर, सुरजपुर, राज्य छत्तीसगढ, ह.मु सातगाव** याला सातगाव येथुन ताब्यात घेवुन दिनांक १७/०१/२०२६ रोजी अटक केली. गुन्हा केल्यानंतर इतर साथीदार हे मिळुन येत नव्हते. त्यांचा कसुन शोध घेत गुन्हयात साखळी पुरावे जोडत बुटीबोरी पोलीसांचे एक पथक आरोपीचे इतर साथीदारांच्या शोध कामी राज्य छत्तीसगढ येथे रवाना झाले. पोलीस पथकाने दिनांक १८/०१/२०२६ रोजी देवनगर, जि. सुरजपुर, राज्य छत्तीसगढ येथुन **२ आरोपींना ताब्यात घेतले आहे.**

## अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन अरोली हदद्‌ीतील अवैध दारू काढणाऱ्या, विक्री करणाऱ्या तसेच अवैध दारू व्यवसायात सक्रिय आरोपी **नामे रामेश्वर माधोराव उके, वय ४५ वर्ष, रा. धर्मापुरी ता. मौदा जि. नागपूर** यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांनी हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे रामेश्वर माधोराव उके, वय ४५ वर्ष, रा. धर्मापुरी ता. मौदा जि. नागपूर याचेवर अवैध रित्या मोहाफुल व गावठी दारू काढणे, विक्री करणे असे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीतांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसारातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे गुन्हेगार रामेश्वर माधोराव उके याचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी

उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यांना **३ महीन्यांकरीता** नागपुर ग्रामीण व जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**रामेश्वर माधोराव उके**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने